**बृहन्मुंबई, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीवरील दि.०१.०१.२०११ पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी सर्वंकष धोरण ठरवण्याबाबत शिफारशी करण्यासाठी विशेष समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: जमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-०१(ई-१५८८०६०)**
**मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक:- २४ सप्टेंबर, २०२६**

**संदर्भ:-** १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांकःजमीन-२०२६/प्र.क्र.२०/जमीन-०१ दिनांक २५ मार्च, २०२६.
२) शासन शुध्दिपत्रक क्र .जमीन-२०२६.क्र.प्र/२०-जमीन/०१, दि .१७.०४.२०२६.
३) शासन शुध्दिपत्रक क्र .जमीन-२०२६.क्र.प्र/२०-जमीन/०१, दि.२५.०६.२०२६.
४) मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीचे इतिवृत्त, दि.२९.०७.२०२६.
५) शासन शुध्दिपत्रक क्र .जमीन-२०२६.क्र.प्र/२०-जमीन/०१, दि .०७.०८.२०२६.

**प्रस्तावना:-**

राज्यभरातील दि.०१.०१.२०११ पूर्वीच्या शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत संदर्भ क्र. १ येथील दिनांक २५ मार्च, २०२६ च्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि, सदर शासन निर्णयाच्या कक्षेतून बृहन्मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका क्षेत्र आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्र हे भाग वगळण्यात आले होते. सदर वगळलेल्या महानगरपालिका क्षेत्रांमधील दि. ०१.०१.२०११ पर्यंतच्या शासकीय जमिनींवर (ज्यात राज्य व केंद्र सरकारच्या जमिनींचा समावेश आहे) निवासी प्रयोजनासाठी झालेले अतिक्रमण नियमानुकुल करण्याबाबत सर्वंकष धोरण ठरविणे अत्यंत आवश्यक आहे.

याअनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९ जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करून सदर समितीमार्फत ३ महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देशानुसार विशेष समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

बृहन्मुंबई महानगरपालिका, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय जमिनीवरील दि. ०१.०१.२०११ पर्यंतचे निवासी प्रयोजनासाठी झालेले अतिक्रमण नियमानुकुल करण्यासाठी धोरणात्मक शिफारसी सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे विशेष समिती गठीत करण्यात येत आहे :-

१) **समितीची रचना:-**

| **अ.क्र.** | **पदनाम/सदस्य** | **समितीमधील पद** |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त, कोकण विभाग | अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी, मुंबई शहर | सदस्य |
| ३. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | सदस्य |
| ४. | जिल्हाधिकारी, पुणे | सदस्य |
| ५. | प्रतिनिधी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA), मुंबई/ पुणे | सदस्य |
| ६. | प्रतिनिधी, बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) | सदस्य |
| ७. | प्रतिनिधी, पुणे महानगरपालिका (PMC) | सदस्य |
| ८. | प्रतिनिधी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) | सदस्य |
| ९. | अधीक्षक, भूमि अभिलेख (SLR), मुंबई, मुंबई उपनगर व पुणे | सदस्य |
| १०. | सह आयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण | सदस्य सचिव |

**२) समितीची कार्यकक्षा (Terms of Reference):-**

१. समितीने मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे महानगरपालिका क्षेत्र आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील दि. ०१.०१.२०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत प्रचलीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA), महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) तसेच इतर प्राधिकरणाच्या धोरणांचा अभ्यास करुन सर्वंकष धोरण सुचविणे.

२. केंद्र शासन अथवा त्यांच्या अधिनस्त प्राधिकरणाच्या जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याबाबत शिफारशी करणे.

३. समितीने आपली कार्यवाही पूर्ण करून ३ महिन्यांच्या मुदतीत आपला अंतिम व स्पष्ट शिफारसींसह अहवाल शासनास (महसूल विभाग) सादर करावा.

**०२.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९२४१८३७५३६६४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=8EE89EB0AEC64F8BC0BDF8D85DDB4706D35ABD8B73C618E114EE98D5C9ECF57B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2026.09.24 18:38:59 +05'30'

**(भगवान सावंत)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम(सा.उ.)) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विभाग आणि औकाफ विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव,महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई.
९) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
१०) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका / पुणे/ पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) ,मुंबई.
१२) जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर/पुणे.
१३) जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख (SLR), मुंबई/मुंबई उपनगर/ पुणे.
१४) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) निवड नस्ती (जमीन-०१)